"श्री चक्रधर स्वामी यांचे तत्वज्ञान: एक चिकित्सक अभ्यास."

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

सामाजिक विद्याशाखेतील तत्वज्ञान विषयातील विद्यावाचस्पती (पीएच.डी.)
पदवी मिळवण्यासाठी शोध-प्रबंधाचा आराखडा.

संशोधक

बांगर परमेश्वर शिवाजी

* **मार्गदर्शक** *

प्रा. डॉ. भुसारे सुनंदा रामचंद्र
तत्वज्ञान विभाग प्रमुख
शिवाजी महाविद्यालय हिंगोली.
जि. हिंगोली. 431513

जानेवारी- 2024

प्रास्ताविक

महाराष्ट्र ही संतांची भूमी आहे. महाराष्ट्रामध्ये अनेक महान संत, समाजसुधारक व तत्त्वचिंतक होऊन गेले. ज्यांनी वेळोवेळी समाजाच्या वैचारिक प्रगतीमध्ये महत्त्वाच भूमिका बजावली समाजाच्या विकासाच्या दृष्टिकोनातून किंवा विज्ञानवादी,जीवनदायी दृष्टिकोन देण्याच्या उद्देशाने सातत्याने समाजामध्ये जागृती घडवून आणण्याचा प्रयत्न विविध संत, तत्वचिंतक व समाजसुधारकांनी केला. ज्या ज्या वेळी समाजामध्ये वैचारिक मागासपण दिसून आले. त्यावेळी समाज परिवर्तनाची धुरा अनेक विविध संप्रदाय, चळवळी यांच्या माध्यमातून समाजामध्ये घडवून आणण्याचे कार्य समाजसुधारक व संत यांनी केले म्हणून महाराष्ट्राच्या वैचारिक उद्धानामध्ये विचारवंतांचा व तत्त्वचिंतकाचा मोठा वाटा असल्याचे आपणास दिसून येते.

मानवी अस्तित्वाच्या सुरुवाती पासून मानवाने सातत्याने बुद्धीचा वापर करून स्वतःचा व समाजाचा विकास घडवून आणला. मानव समाज संघटित रूपात आल्यापासून त्यांच्या वैचारिक क्रांतीवर वेळोवेळी बुरसटलेल्या विचारांची पुट निर्माण होत आली त्या त्या वेळी समाजाची वैचारिक उसळण करून परिवर्तनवादी विचार केल्याचे दिसून येते. महाराष्ट्राच्या इतिहासात अकराव्या शतकापासून सामाजिक व वैचारिक क्रांतीला फार मोठ्या प्रमाणात सुरुवात झाल्याचे दिसून येते. त्या मध्ये प्रामुख्याने महानुभाव संप्रदायाचा समावेश होतो.

श्री चक्रधर स्वामींचा काळ हा बाराव्या शतकाचा होता. त्या काळी सिंघनदेव यादव, महादेवराव यादव, अमनदेव यादव आणि रामदेव यादव या शासकांचा तो काळ होता. याच काळात श्री चक्रधर स्वामींनी आपली परिवर्तनवादी धर्म मते महाराष्ट्रातील सामान्य जणांना सांगितली व त्यांचा प्रसार केला. या काळामध्ये चातुर्वरण्य-व्यवस्थाही संपूर्ण भारतभर पसरलेली होती. .तसेच ती महाराष्ट्रात ही होती. ही विकृती शिगेस पोचली होती. स्वामींच्या काळात या सामाजिक विकृतीचा कळसच झाला होता. म्हणून या काळामध्ये श्री चक्रधर स्वामींनी आपल्या तात्विक विचाराच्या माध्यमातून या समाजातील ही विषमता दूर करण्याचा प्रयत्न करून आपल्या तत्वज्ञानाचा प्रचार व प्रसार संपूर्ण महाराष्ट्रभर केला जातिपातीच्या उच्चनीच्चत्वाच्या भिंती बांधून जगणाऱ्या समाजाला जाती निर्मित विचार सोडा असे श्री चक्रधर स्वामी तत्त्वज्ञान सांगितले श्री चक्रधर स्वामीयांनी आपल्या समतावादी तात्विक विचारसरणीतून स्त्रियांना माणूस म्हणून जगण्याचा अधिकार प्राप्त करून दिला. पुरुषापेक्षा स्त्रियांनी स्वतःला कमी न लेखता आचरण करावे. याबाबत त्यांनी नेहमी प्रेरणा दिली. त्यांच्या या दृष्टिकोनाचा प्रभाव स्वामींच्या पश्चात देखील पंथावर टिकून राहीला त्यांनी स्त्रियांमध्ये व्यक्ती स्वातंत्र्याचा दृष्टिकोन रुजवण्याचा प्रयत्न केला आहे. म्हणून मुळातच या पंथाची उभारणी ही समानतेच्या तत्त्वावर झालेली दिसून येते. स्वामींच्या काळात समाजात कमालीची विषमता होती. समाजाचे अंध:पतन झालेले होते. हिंदूधर्म शास्त्रांचा समाजावर प्रचंड

प्रभाव निर्माण झालेला होता. तेव्हा अशा प्रतिकूल परिस्थिती मध्ये त्यांनी आपल्या तत्वज्ञानाच्या माध्यमातून ही समाजातील विषमता नष्ट करून समाजाला एक नवी दिशा देण्याचे काम केले. स्वामींनी आपल्या तत्त्वज्ञानाच्या माध्यमातून सुधारक विचारांचा प्रसार जाती प्रथेची निर्मूलन व परिवर्तनाची हाक देऊन समाजामध्ये स्वातंत्र्य,समता,बंधुता व न्याय अशा प्रकारची नीतीमूल्य समाजामध्ये रुजवण्याचे महान कार्य केले आहे. त्यांनी शंकराचार्य रामानुजाचार्य यांच्या तत्वज्ञानाचे खंडन करून आपले द्वैतत्त्वज्ञान जगासमोर मांडले आहे. पाश्चात्य शिक्षणाच्या प्रभावामुळे भारतीय विचारवंत आणि बुद्धिवादी यांच्या मध्ये वैचारिक क्रांती घडून आली. त्यातून आपला समाज व संस्कृती बाबत आत्मपरीक्षण सुरू झाले. या वैचारिक मंथनातून सुशिक्षित भारतीयांचे भान जागृत होत गेले. या परिवर्तनाच्या लाटेत स्त्री विषयक प्रश्न, कर्मकांडा विषयी प्रश्न, जाती भेदाविषयीचे प्रश्न, अंधश्रद्धा व देवता इत्यादी, विषया वरती सुधारण्यासाठी त्यांनी फार मोठे मोलाचे कार्य केले.

सर्व सामान्य माणूस आणि धार्मिक बंधने यात झालेली घुसमट, माणसाची होणारी धार्मिक पिळवणूक, कर्मकांड, अंधश्रद्धा, यात अडकलेल्या सर्वसामान्य माणसाची ही अवस्था श्री चक्रधर स्वामींनी बघितली तेव्हा त्यानी संपूर्ण महाराष्ट्रभर भ्रमण करून सर्वसामान्यांचे दुःख उघड्याडोळ्यांनी बघितली, त्यांची ही अवस्था, अज्ञान, दुःख नष्ट करण्याचा प्रयत्न केला. शुद्रांची आणि

स्त्रियांची होणारी हेळसांड बघितली व आपल्या तात्विक विचाराच्या माध्यमातून ह्या साऱ्या गोष्टी मोडण्याचा प्रयत्न केला. म्हणून तत्वाच्या मार्गदर्शनानुसार मानवी संस्कृती विकसित होत आली आहे. पर्यायाने त्यामुळेच मानवी संस्कृती वृद्धिगत झाली आहे. समाजाच्या सुव्यवस्थेसाठी मानवाने पावलोपावली नितीची किंवा तत्वांची मदत घेतली आहे. त्यामुळे वेळोवेळी प्रसंगांवरूप बदलत गेलेल्या तत्त्वांची ही चिकित्सा होणे गरजेचे आहे. प्रस्तुत विषय निवडीचा ही हाच उद्देश आहे. निवडलेल्या विषयाची चिकित्सा करत असताना जीवनाभिमुख तत्त्वज्ञान महत्त्वपूर्ण मानले गेले आहे.

म्हणून त्यांच्या या कार्याची ओळख समाजातील सर्व स्तरातील लोकांना झाली पाहिजे हा उद्देश डोळ्या समोर ठेवून हे शोध कार्य करण्याचे योजिले आहे. अतिशय तळागाळातील सर्वसामान्य बहुजनांना त्यांनी माणूस म्हणून जीवन जगण्याची संधी उपलब्ध करून समाजात नैतिक मूल्यांची रुजवण केली. म्हणून ते या समाजाचे उद्धारक ठरतात समाजामध्ये प्रबोधन घडवून आणण्याचे जे कार्य त्यांनी केले आहे ते वाखाण्याजोगे आहे. म्हणून प्रस्तुत शोध-प्रबंधा मध्ये त्यांच्या तात्विक कार्याची चिकित्सा करण्याचा प्रयत्न केला गेला आहे.

संशोधन पद्धती-

प्रस्तुत संशोधन विषयात वर्णनात्मक व विश्लेषणात्मक या पद्धतीचा अवलंब करण्याचे ठरविले आहे. उपलब्ध संदर्भ साधनांच्या माध्यमातून प्राप्त माहिती

चिकित्सकपणे अभ्यासून त्यांची मांडणी करणे संशोधकांनी योजले आहे. त्यात प्रामुख्याने स्थळ महात्म्य, कथा यांचा उपयोग करण्यात येईल. त्याच बरोबर महानुभाव पंथातील ग्रंथ व इतर संदर्भित ग्रंथांची मदत घेतली जाईल.

विषयाची निवड-

कोणत्या ही क्षेत्रात संशोधन करीत असताना ते संशोधन कशासाठी केले जातआहे हा उद्देश डोळ्यासमोर ठेवून संशोधन केले पाहिजे. प्रस्तुत विषयाच्या निवडीचे मूळ कारण म्हणजे श्री चक्रधर स्वामींनी मांडलेले तात्विक विचार आजही तळागाळातील सर्व सामान्य लोकांपर्यंत पोहोचले नाही तेव्हा त्यांचे हे तत्वज्ञान सर्वसामान्या पर्यंत पोहोचवून या समाजातील ज्या काही अनिष्ट रूढी, प्रथा, परंपरा आहेत त्या नष्ट करून समाजाचा सर्वांगीण विकास कसा होईल हा प्रामाणिक हेतू डोळ्यासमोर ठेवून या विषयाची निवड करण्यात आली आहे.

विषयाची व्याप्ती.

संशोधनासाठी विषय निवडल्या नंतर त्या विषयाची व्याप्ती म्हणजे अभ्यास क्षेत्र निश्चित करणे गरजेचे असते प्रस्तुत संशोधनासाठी निवडलेल्या विषयाची व्याप्ती विस्तृत स्वरूपाची आहे. श्री चक्रधर स्वामी साक्षात परमेश्वराचा अवतार असल्यामुळे त्यांच्या विचारांचा अवाका खूप विस्तृत आहे. संशोधनासाठी निवडलेल्या विषयाचा तात्विक दृष्टिकोनातून अभ्यास करीत असताना श्री चक्रधर स्वामींनी

मांडलेल्या सामाजिक, धार्मिक व सांस्कृतिक इत्यादी क्षेत्रात आपले तत्वज्ञान मांडले आहे. त्याच बरोबर समाजातील स्त्रियांचे स्थान व त्यांच्या कार्यातून प्रतीत होणारे तत्वज्ञान यांची चिकित्सा प्रस्तुत शोध प्रबंधात केली जाणार आहे.

उद्दिष्टे.

1. श्री चक्रधर स्वामींचे सामाजिक समता विषयक तत्वज्ञान अभ्यासणे.

2.श्री चक्रधर स्वामींच्या जीवन कार्याची चिकित्सा करणे.

3. महानुभाव पंथाच्या उदयाची पार्श्वभूमी व तेराव्या शतकातील सांस्कृतिक, धार्मिक परिस्थिती अभ्यासणे.

4. महानुभाव पंथाचा स्त्री-विषयक दृष्टिकोन अभ्यासणे.

5. श्री चक्रधर स्वामींचे तात्विक विचार अभ्यासणे.

गृहीतके-

संशोधन करीत असताना संशोधक आपल्या संशोधनाची काही गृहीतके ठरवितो व त्यानुसार मांडणी करीत असतो प्रस्तुत शोधप्रबंधाची काही गृहीतके ठरवली गेली आहेत. ती पुढील प्रमाणे आहेत.

1.श्री चक्रधर स्वामींनी समाजाला तात्विक बैठक दिली.

2. श्री चक्रधर स्वामींचे व्यक्तिमत्व अष्टपैलू होते.

3.श्री चक्रधर स्वामी ही धर्मचिकित्सक होते.

4.श्री चक्रधर स्वामी हे बहुजनांचे प्रणेते होते.

5.महानुभाव पंथात स्त्रियांचे स्थान औदार्यपूर्ण होते.

संशोधनाची आवश्यकता व महत्व-

संशोधन हे समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक असते समाजाचा विकास सर्वांगीण स्वरूपात होणे गरजेचे असते समाजामध्ये अनेक प्रकारच्या अनिष्ट रूढी, प्रथा व चालीरीती असतात. आणि त्यांची उकल होऊन ती सर्व सामान्यांच्या लक्षात आणून देणे हे फार गरजेचे असते. कारण समाजातील तसेच संशोधन क्षेत्रातील प्रश्नही मोघमपणे सोडवलेले असतात त्यामध्ये त्रुटी राहण्याची शक्यता असते .त्यामुळे सामाजिक समस्या असो अथवा एखादा सामाजिक प्रश्न त्यांचे संशोधन होणे गरजेचे असते. प्रस्तुत संशोधन विषयाचे संशोधन होणे हे गरजेचे आहे कारण श्री चक्रधर स्वामीयांचे सामाजिक, सांस्कृतिक व धार्मिक क्षेत्रातील कार्य हे महत्त्वपूर्ण आहे त्यांनी बहुजन, गोरगरीब, दिनदलित, पीडित व शोषित यांचा प्रश्न आपल्या तात्विक विचारांच्या माध्यमातून जगासमोर प्रखरपणे मांडला होता. त्यांनी सर्वांच्या अस्तित्वाचा प्रश्न सर्वांच्या समोर मांडला आहे त्यांनी भारतीय धर्मावर पडलेली कर्मकांडांची पुंट बाजूला सारण्याचे काम केले होते .स्त्रियांची प्राचीन काळापासूनची विटंबना,अस्तित्व, हीन जगणे त्यांनी अत्यंत

आत्मीयतेने मांडले होते. म्हणून अशा विषयावरती संशोधन होणे ही काळाची गरज आहे . समाजाला लागलेला कलंक त्यांनी आपल्या तात्विक विचारतून दूर केला.

तथ्य संकलन-

सामाजिक संशोधन पद्धती ही शास्त्रीय स्वरूपाची आहे. सामाजिक विषयात संशोधन करताना विविध शास्त्रीय पद्धतीचा व तंत्रांचा अवलंबकरूनच निष्कर्ष किंवा सिद्धांतांचे प्रतिपादन करावे लागते. त्यामुळे सामाजिक संशोधनात संशोधकाच्या कल्पनाशक्तीला कुठलेही स्थान नसते. कोणतेही संशोधन हे सत्यशोधण्यासाठीच केले जाते. तसेच अनुभवप्रामान्य हे शास्त्रीय पद्धतीचे महत्त्वाचे लक्षण आहे. म्हणूनच प्रस्तुत संशोधनात विश्लेषण व वर्णनात्मक या पद्धतीने तथ्याचे विश्लेषण केले आहे.

सिद्धांत कल्पना-

प्रस्तुत संशोधनाच्या माध्यमातून श्री चक्रधर स्वामी यांच्या तात्विक विचारांची प्रगल्भता, अष्टपैलू व्यक्तिमत्व, त्यांचे धर्मचिंतन ,समाजातील स्त्रियांचे स्थान ,सामाजिक व सांस्कृतिक चळवळी या संदर्भातील त्याची भूमिका स्पष्ट केली गेली आहे.

प्रकरण रचना

प्रकरण: पहिले.
महानुभाव पंथ आणि तत्कालीन सामाजिक चळवळी.

पंथ म्हणजे मार्ग हा एका परीने जीवन मार्गच असतो जग जीवन आणि जगदीश यांचे नेमके स्वरूप काय; त्यांच्याशी माणसाचा संबंध काय; मानवी जीवनाचे श्रेयस कशात आहे; त्या उद्दिष्ट प्रत जाण्याचा मार्ग म्हणजे पंथ त्यात जीवनाकडे पाहण्याची एक विचारसरणी अभिप्रेत असते. त्याप्रमाणे वागण्याचा एक आचार धर्महीअसतो. या दोन्हीही मिळून त्या त्या पंथाची आपली अशी आदर्श जीवन सरणी निष्पन्न होते तिला श्रेष्ठ सत्पुरुषांच्या साधनेचा आधार असतो म्हणून महान तेजाणीयुक्त पुरुषांचा पंथ म्हणजे महानुभाव पंथ होय. महानुभाव पंथाच्या तत्कालीन वारकरी संप्रदाय, वीरसैव संप्रदाय, वैष्णव पंथ, सुफी पंथ, दत्त संप्रदाय, वैदिक पंथांचा समावेश होतो यांचा पंथीय दृष्टीने विचार केला तर त्यांनी इतर पंथीयाकडे दुर्लक्ष केले आहे. यांचे कारण म्हणजे मराठी संस्कृती आणि अभ्यास आतापर्यंत वैदिक धर्माधिकाऱ्यांनी केला आहे. त्यांनी इतर धर्म आणि संप्रदायाकडे लक्ष दिलेले नाही म्हणून वरील प्रकरणात महानुभव पंथ व तत्कालीन सामाजिक चळवळीं ची चिकित्सा करण्याची योजिले आहे.

प्रकरण: दुसरे.

श्री चक्रधर स्वामींचे जीवन व महानुभाव संप्रदाय.

महानुभाव पंथाचे प्रवर्तक आणि पंथाच्या पंचकृष्णात समाविष्ट झालेले अवतारी पुरुष म्हणून श्री चक्रधर स्वामींना ओळखले जाते. त्यांचे मूळ नाव हरपाळ देव असे होते. बाराव्या शतकाच्या पूर्वार्धात गुजरात मधील भडोच येथे शके ११४२

भाद्रपद महिन्याच्या शुक्ल पक्षाच्या रविवारी सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामींचा अवतार झाला. त्याच्या वडिलांचे नाव विशाल देव व आईचे नाव मालनदेवी होते. संत परंपरेचा विचार करीत असताना खरे संत परंपरा ही महानुभाव नाथ पंथी वारकरी इथ पासून बहिणाबाई कबीरा पर्यंतचा अनेक संताचा विचार करता येतो ज्ञानेश्वर महाराजांच्या काही काळा अगोदर महानुभाव संप्रदाय उद्यालाला त्या काळामध्ये समाज परिवर्तनासाठी अतिशय महत्त्वपूर्ण असा हा महानुभव पंथ असल्याचे आपल्याला जाणवते. पंचकृष्णांना मानणारा महानुभाव पंथ हा महाराष्ट्रातील प्रमुख धर्म संप्रदाय म्हणून ओळखला जातो. महानुभाव पंथ हा संन्यास धर्म आहे येथे संन्यासग्रहणावर अतिशय भर होता. या पंथात स्त्रियांनाही संन्यास दिला जातो अशा वैराग्यशील स्त्रीला तपस्विनी म्हणतात. महानुभाव पंथीय पंचकृष्णांचे सतत स्मरण करीत असतात. म्हणून प्रस्तुत प्रकरणात श्री चक्रधर स्वामींचे जीवन व महानुभव संप्रदायाची चिकित्सा करण्याचे योजिले आहे .

प्रकरण: तिसरे

श्री चक्रधर स्वामींचे आध्यात्मिक व सामाजिक समता विषयक विचार.

चक्रधर स्वामी यांनी वैदिक तत्त्वज्ञान बाजूला ठेवून ज्ञान आणि भक्ती यांचा समन्वय करणारे तत्त्वज्ञान मांडले त्यामध्ये चातुरवर्णी व्यवस्थेवर हल्ला चढविला त्यांच्या पंथाच्या स्त्रिया, सकल जाती, शूद्र बहुजन सर्वांनाच दीक्षा घेण्याची सोय ठेवली. संपूर्ण अहिंसा आणि कडकडीत वैराग्य यांचे

पालन अपरिहार्य मानले. व पुढे इतर संतांनी केलेल्या लोक भाषेचा पुरस्कार हे या काळातील खूप मोठे सांस्कृतिक आणि सामाजिक कार्य आहे. महानुभाव संप्रदायाचे मुख्य संस्थापक श्री चक्रधर स्वामी यांनी महाराष्ट्रात आपली विचार प्रणाली रुजविण्यास सुरुवात केली तेव्हा महाराष्ट्रात यादवांची राजवट कार्यरत होती. यादव राजे सनातन धर्माभिमानी होते . महाड पंडित यांनी चतुर वर्ग चिंतामणी हा ग्रंथ लिहिला. या ग्रंथात सांगितलेले वृत्तवैफल्य सामान्य लोकांच्या आचरणात आल्यामुळे अंधश्रद्धा आणि कर्मकांडाचे स्त्रोत सर्वत्र माजले होते वर्णभेद, जातीभेद, रोटी बंदी, दैवतांच्याउपासना यात बहुजन समाज भरडला जात होता. म्हणून अशा वैदिक तत्त्वज्ञानाला विरोध केला व या विरोधाला न जुमानता सामाजिक परिवर्तनाचे कार्य केले. चक्रधर स्वामी यांनी केलेल्या सामाजिक परिवर्तन आणि धर्मशास्त्र व साहित्याची दार समाजातील उपेक्षितासाठी खुली झाली. सामाजिक समतेचा आद्यप्रवर्तक आजचा पहिला मान स्वामी कडे जातो. त्या काळामध्ये समाज परिवर्तनासाठी अतिशय महत्त्वपूर्ण असा हा महानुभव पंथ असल्याचे आपणास जाणवते. ते मानवाप्रमाणे पशुपक्षी आणि हिंस्र प्राण्यावरती ही प्रेम करत होते स्वामींचे भक्तगण हे बहुतांशी ब्राह्मण असले तरीही ते उपेक्षित जातीतील माणसांनाही जवळ करीत असत म्हणून ते समतेचे अतुल पुरस्कर्ते होते.

प्रकरण:चौथे

श्री चक्रधर स्वामी यांची स्त्री, शुद्रांच्या विकासातील भूमिका.

स्वामींच्या काळात स्त्रियांचा शिक्षणाचा प्रश्न अत्यंत कठीण होता 'न स्त्री स्वातंत्र्य महर्ती'. ही मनुची कठोर आज्ञा खूद ब्राह्मण विद्वानांना जन्म देणाऱ्या ब्राह्मण स्त्रियांची सुद्धा हीच अवस्था होती. तर शूद्र समजल्या जाणाऱ्या स्त्रियांची किती कठीण अवस्था असेल अशा भयावह व कठीण प्रसंगी श्री चक्रधरांनी समतेचा व स्त्री आणि शूद्रांना ज्ञानाचा अधिकार असल्याचे सांगितले. आणि त्यांची अंमलबजावणी केली. पुरुषांना त्यांनी "तुमचा तो जीव" आणि स्त्रियांचा काय?जीवलिया काय? हा प्रश्न केला स्त्री व पुरुषाचा जीव सारखाचदोघांच्याही जीवांना ज्ञान मिळवण्याचा व भक्तीचा समान अधिकार असल्याचे सांगितले. सवर्ण व शूद्रांना सुद्धा हाच न्याय दिला. स्वामीच्या भक्तामध्ये तत्कालीन महार, मांग,चांभार, आदिवासी ,मुसलमान व सवर्ण स्त्रियांचा सहभाग होता. श्री स्वामींच्या सानिध्यात महादाईसा, बाईसा, खेई ,गोई , पोमाईसा अशा कितीतरी स्त्रिया होत्या. महादाईसा तर कवियत्री होत्या. म्हणून वैदिक परंपरेला नाकारून स्त्री, शूद्रासह सर्वांना मोक्षाचा समान अधिकार दिला. सतत काम करणे व अंधकारात मरेपर्यंत जगणे एवढेच दुर्दैव त्यांच्याकडे लिहिले होते. बालविवाह, केशवपण करून पशुहून बेहतर जीवन जगत असत. म्हणून ही सामाजिक क्रूरता स्वामीच्या हृदयाला दुखावणारी होती. म्हणून त्यांनी या विकृतीविरुद्ध बंड पुकारून त्याचा विरोध केला. व समाजामध्ये स्त्रियांना व शूद्रांना मानाचे स्थान प्राप्त करून दिले.

प्रकरण: पाचवे

श्री चक्रधर स्वामींनी केलेले समाज प्रबोधन.

महानुभाव पंथ हा एक संप्रदाय असून या पंथाचे संस्थापक श्री चक्रधर स्वामी होत. श्री चक्रधर स्वामींच्या काळात देवगिरीचा यादव राजा रामदेवाची राजवट चालू होती हा कालखंड महाराष्ट्रातील ऐश्वर्या चा आणि समृद्धीचा कालखंड समजला जातो पण या काळात सामाजिक विषमता फार होती यज्ञयाग आणि देवतांची उपासना समाजात सर्वत्र बोकाळली होती. देवळात पुराणे आणि नृत्यच अधिक चालत असे. अंधश्रद्धा सर्वत्र पसरली होती त्यामुळे माणसाचा सामाजिक, धार्मिक व आर्थिक कोंडमारा होत असे पारंपारिक सामाजिक विषमतेपासून व व्रत वैफल्य आदी गोष्टी पासून लोकांना दूर करणे हे सामान्य माणसाच्या हिताच्या आहे हे चक्रधर स्वामींनी ओळखले होते अशा परिस्थितीत द्वैती तत्त्वज्ञानाचा प्रसार केला. आणि सामान्य देवतांचे प्रस्थ कमी केले. त्यांनी आपल्या पंथात शूद्र, स्त्री, ब्राह्मण, क्षत्रिय अशा सर्वांना संन्यास घेण्याची सोय केली. म्हणून त्यांनी जाती व्यवस्था, कर्मकांड व अनिष्ट चालीरीती यांच्यावरती आपल्या तात्विक विचाराच्या माध्यमातून समाज प्रबोधनाचे कार्य केले.

निष्कर्ष-

श्री चक्रधर स्वामींच्या तात्विक विचारांचा अभ्यास केल्यानंतर पुढील प्रमाणे निष्कर्ष मिळतात. एकंदरीत अशा प्रतिभावंतांचे व्यक्तिमत्व हे अष्टपैलू स्वरूपाचे होते. तसेच श्री चक्रधर स्वामी हे एक तत्वचिंतक,धर्म चिकित्सक व थोर समाज

सुधारक होते हे आपल्या लक्षामध्ये येते. त्याच बरोबर त्यांचे तत्त्वज्ञान सर्व सामान्यांना समजेल असे सरल व प्रगल्भ स्वरूपाचे होते. ते बहुजनांचे कैवारी होते. त्यांनी सर्वसामान्यांचे प्रश्न सोडवून सर्वांना समानता प्रस्थापित करून दिली. म्हणून श्री चक्रधर स्वामी हे अभ्यासू व व्यासंगी तत्त्वचिंतक होते हे आपल्या शोध प्रबंधातून सिद्‍ध होते. प्रस्तुत शोध आराखडा हा अभ्यासकाच्या प्राथमिक स्वरूपाच्या अभ्यासावर आधारित असून अधिक संदर्भ साधनांच्या अध्ययनानंतर आवश्यक वाटल्यास त्यात बदल होणे अभिप्रेत आहे.

संदर्भग्रंथसूची-

1. श्रीचक्रधरोक्तसूत्रपाठ, - नेने ह.ना.-व्हीनस प्रकाशन पुणे-1942.

2.नित्यदिनीलीळा, नेनेह. ना.-व्हीनस प्रकाशन पुणे-1942.

3.लीळाचरित्र- डॉ. कोलते वि.भि.-शासकीय प्रत पुणे-1982.

4.श्रीकृष्णचरित्र- तुळपुळेशं. गो.-व्हीनस प्रकाशन पुणे-1973.

5.सर्वज्ञश्रीचक्रधरस्वामी- प्रा.पुरुषोत्तम नागपुरे जून-2002.

6.श्रीचक्रधरचरित्र- विष्णू भिकाजी कोलते.-अरुण प्रकाशन मलकापूर-1952.

7. पंचोपाख्यान- डॉ. वि . भि. कोलते. प. आ.-1979.

8. श्री चक्रधरस्वामींचे आध्यात्मिक व सामाजिक क्रांतीचे स्वरूप- डॉ. रा. बो. मेश्राम-2002.

9. लीळाचरित्र एकांक- प्रा. सुशीला सोलापुरे- कैलास पब्लिकेशन औरंगाबाद-2007.
10. पाचभक्तीसंप्रदाय. र. रा. गोसावी.-मोघे प्रकाशन पुणे कोल्हापूर-1974.
11. लीळाचरित्र एकांक –ब्रह्मानंद देशपांडे-कैलास पब्लिकेशन औरंगाबाद-1990.
12. दृष्टांतपाठ -डॉ. यू. म. पठाण.-चिन्मय प्रकाशन औरंगाबाद- 2004.
13. धर्म संप्रदाय आणि मध्ययुगीन मराठी वांङ: मय –रत्नाकर बाबुराव मंचरकर – प्रतिमा प्रकाशनपुणे-2000.
14. लीळाचरित्र: एकांक -डॉ. मदन कुलकर्णी-विजय प्रकाशन नागपूर-2002.
15. मध्ययुगीन साहित्य विषयी -डॉ.सतीश बडवे- मीरा बुक्स पब्लिकेशन-2010.
16. भारतीय दर्शने आणि महानुभाव तत्वज्ञान- रा .गो. मेश्राम –महानुभा व साहित्य प्रकाशन अहमदनगर-2006.
17. श्रीचक्रधर -शंकपाळ,बापूजी –नॅशनल बुक ट्रस्ट ऑफ इंडिया नवी दिल्ली-1991.
18. भारतीय धर्म व तत्त्वज्ञान- वर्णेकर, श्रीधर महाराष्ट्र विद्‍यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ, पुणे-1975.
19. श्री चक्रधरोक्त सूत्रपाठ- नेने ह. ना.-विदर्भ संशोधन नागपूर-1987.
20. लीळाचरित्र एकांक प्रा .भालचंद्र सोहनी –श्री मंगेश प्रकाशन नागपूर- 1993.
21. श्री चक्रधर चरित्र- शिक्षण व सेवा विभाग महाराष्ट्र शासन मुंबई-1982.
22. महानुभावांचा आचार धर्म - वि.भि. कोलते.-अरुण प्रकाशन मलकापूर.

23. महानुभाव संशोधन खंड-१- वि. भि. कोलते. अरुण प्रकाशन-1962.

24. श्रीचक्रधर शेवटचे प्रकरण - वि.भि.कोलते. –ओंकार नागराज महानुभाव औरंगाबाद-1982

संशोधक

बांगर परमेश्वर शिवाजी

***मार्गदर्शक** *

प्रा. डॉ. भुसारे सुनंदा रामचंद्र
तत्वज्ञान विभाग प्रमुख
शिवाजी महाविद्यालय
हिंगोली.जि. हिंगोली. 431513